**Sanskruti, August 19**

# टीसीएस आयटी विझ २०११ ची पुणे फेरी २३ ऑगस्टला

**पुणे :** माहिती तंत्रज्ञान सेवा, व्यवसायांकरता आवश्यक सुविद्या व आऊटसोर्सिंग सेवा पुरविणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस अर्थात टीसीएसने टीसीएस आयटी विझ २०११ च्या पुणे फेरीची घोषणा केली आहे. शाळांकरता आयोजित केली जाणारी भारतातील सर्वात मोठी तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा म्हणून नावाजली जाणारी टीसीएस आयटी विझ पुण्यातील कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडेल. इयत्ता आठवी ते बारावीतील विधार्थी (पीयु विधार्थ्यांसहीत) टीसीएस आयटी क्विझमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेशशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था एकापेक्षा अघिक संघ पाठवू शकते. एका संघामध्ये फक्त दोनच स्पर्धक असणे आवश्यक आहे. यंदाच्या वर्षी टीसीएस आयटी क्विझच्या विभागीय फेंया हैद्राबाद, अहमदाबाद, बँगलोर, चेन्नई, कोईम्बतूर, पुणे, कोलकाता, भुवनेश्वर, कोची, लखनौ, दिल्ली व मुंबई या बारा शहरांमध्ये घेतल्या जाणार आहेत. विभागीय फेंयांनंतर डिसेंबरमध्ये राष्ट्रीय स्तरावर अंतिम फेरीचे आयोजन केले जाईल. विभागीय स्तरावरील १२ विजेते संघ राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीत टीसीएस आयटी विझ नॅशनल चॅम्पियन बनण्यासाठी प्रयत्न करतील. इच्छुक शालेय संस्थांनी आपआपल्या प्रवेशिका २० ऑगस्ट या दिवशी किंवा त्यापूर्वी टीसीएस आयटी विझ कोऑर्डीनेटर यांचेकडे टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस, हडपसर इन्डस्ट्रीयल इस्टेट, पुणे ४११ ०१३ या पत्त्यावर पाठवाव्यात. अघिक माहितीकरता कृपया ०२०-६६००८६२२७/९१ ९२२५५०८३०४ यावर संपर्क साधावा. या वर्षी ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविद्यादेखील शाळांकरता उपलब्ध करवून देण्यात आली आहे. अघिक माहितीकरता कृपया www.csitwiz.com या वेबसाईटवर संपर्क साद्यावा.